# शिर्डी नगरपरिषद,शिर्डी

## “शिर्डी नगरपरिषद अंतर्गत करण्यात आलेली उल्लेखनीय  कामे ”



# शिर्डी शहर/नगरपरिषद बाबत प्राथमिक माहिती.

- शिर्डी नगरपरिषद स्थापना - 1990.
- सन 2011 लोकसंख्या - 36004.
- सन 2026 लोकसंख्या - 45000.
- तरंगती लोकसंख्या - 60 ते 70 हजार

  (उत्सव कालावधीत) - 1 ते 2 लाख.
- नगरपरिषद क्षेत्रफळ - 13 चौ.कि.मी.
- शहरातील रस्त्यांची एकुण लांबी - 135 कि.मी.(हायवे-2.700 किमी,24.0 मी –1.0 किमी,18.0 मी.-12 किमी.12.0 मी 15.0 कि.मी. इतर – 104.30 कि.मी.

- एकुण मालमत्तांची संख्या - 11168
- नगरपरिषद एकुण अंदाजपत्रक - 65 कोटी (शासन अनुदानातून होणाऱ्या भांडवली खर्चासह)
- नगरपरिषद महसुली उत्पन्न - 11.87 कोटी. नगरपरिषद महसुली खर्च - 13.00 कोटी.
- नगरपरिषद पाणीपुरवठा स्त्रोत - गोदावरी उजवा तट कालवा.
- न.प.पाणीपुरवठा साठवण तलाव क्षमता - 580 द.ल.ली.
- आपतकालीन यंत्रणा - शिर्डी न.प.- 1 अग्निशमन गाडी व 1-मिनी रेस्क्यु अग्निशमन गाडी.
  - संस्थान - 2 अग्निशमन गाडी.

# साई पालखी  उदयान :-

शिर्डी  नगरपरिषदद्वारे श्री साईबाबा मंदिर गेट क्रं.4 समोर असलेली सर्व अतिक्रमणे काढून विकास आराखडयामध्ये असलेले उदयान विकसीत करण्यात आले आहे. याद्वारे शहराच्या सुशोभीकरणात भर पडून साईभक्तांना या उदयानाचा लाभ घेता येत आहे.

उपलब्ध निधी- अमृत योजना व 14 वा वित्त आयोग






Sai Sayali
SAMSUNG
श्री साई पालखी उद्यान
शिर्डी नगरपरिषद, शिर्डी

# सौर उर्जा प्रकल्प :-

शिर्डी नगरपरिषदद्वारे जलशुध्दीकरण केंद्र- 500 किलो वॅट, मलनिस्सारण केंद्र-800 किलो वॅट, घनकचरा प्रकल्प- 120 किलो वॅट, नगरपरिषद 11 इमारती - 110 किलो वॅट असे सौर ऊर्जा प्रकल्प उभारले आहे. तसेच शहरात विविध रस्त्यांवर सोलर पथदिवे उभारले आहेत. आज रोजी नगरपरिषद सौरउर्जा प्रकल्पातून मासीक 1,75,000 युनिट सौर विज निर्मीती क्षमता निर्माण होऊन त्याद्वारे वार्षिक रु.2.00 कोटी रकमेची बचत होत आहे.

- **उपलब्ध निधी-** अमृत योजना, माझी वसुंधरा अभियान बक्षीस रक्कम, स्वच्छ भारत अभियान बक्षीस रक्कम.


शिर्डी नगरपरिषद सौर उर्जा प्रकल्प, सर्वे क्र. 24



# मलनिस्सारण केंद्र
# सोलर प्रकल्प





# जलशुध्दीकरण केंद्र येथील सोलर प्रकल्प





# Tertiary Treatment Plant (TTP):-

शिर्डी नगरपरिषदच्या कार्यरत असलेल्या मलनिस्सारण प्रकल्पातून निघणारे प्रक्रियायुक्त पाणी पाटबंधारे विभागाच्या चारीमध्ये सोडून शेतीसाठी वापरणेकरीता त्यावर TTP मध्ये तिस-या स्तरावरील प्रक्रिया करुन सदर पाण्याचा अधिक सुयोग्यपणे व शाश्वत स्वरुपाचा वापर करण्यात येत आहे. सदर प्रकल्प कार्यान्वीत झालेला आहे.

- उपलब्ध निधी- अमृत योजना



**TTP Plant**



**TTP Pumping Machinery**




400
300
200

# आदर्श घनकचरा प्रकल्प :-

शिर्डी नगरपरिषदद्वारे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्राप्त बक्षीस रकमेतून सर्वे क्र.24 या जमीनीचे भूसंपादन करुन येथे आदर्श व पथदर्शी असा घनकचरा प्रकल्प उभारण्यात आला आहे. यामध्ये संपुर्ण प्रकल्पाला वॉल कंपाऊंड, सुका कचरा प्रक्रियेसाठी 20000 स्केअर फुटचे गोडावून, हेवी डयुटी श्रेडींग मशीन, संपुर्ण रस्ते कॉंक्रीटीकीरण, भुयारी गटर, विंड्रो प्लॅटफार्म, कंपोस्ट खत निर्मीती प्रकल्प, RDF प्रकल्प, सौर उर्जा प्रकल्प, बांबू लागवड, देशी प्रजातीची वृक्ष लागवड, बकुळ उदयान व लॉन, सि.सि.टी.व्ही कॅमेरा, आग प्रतिबंधात्मक उपाययोजना, स्ट्रीट लाईट, कर्मचा-यांसाठी RO पाणी व आधुनिक वॉश रुम तसेच महिला कर्मचा-यांसाठी चेंजींग रुम, व्हिजीटर पार्कींग, पाणीपुरवठा पाईपलाईन व अत्याधुनिक व वातानुकूलीत व्हिजीटर सेंटर वीथ एल.ई.स्क्रीन्स उभारण्यात आले आहेत. याशिवाय पिलेट्स निर्मीती प्रकल्प, ESR व साईंटीफिक लॅन्डफील साईटचे काम सुरु आहे.

- उपलब्ध निधी- स्वच्छ भारत अभियान, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी नगरपरिषद निधी, माझी वसुंधरा अभियान, जिल्हा नियोजन निधी




THE
BAKUL GARDEN
& VISITOR CENTER

# घनकचरा प्रकल्प व्हिजीटर सेंटर







शिर्डी नगरपरिषद, शिर्डी
ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प
Wet Waste
Processing Plant
सुका कचरा प्रक्रिया प्रकल्प
Dry Waste
Processing Plant

# Sanitary Waste Processing Plant (Incinerator Machine)






# Wet Waste Processing- Windrow Composting





# ओल्या कच-यापासुन कंपोष्ट खत निर्मीती प्रकल्प















Material Recovery Facility- MRF Centre





# SHREDDER MACHINE





**Refused Derived Fuel- RDF**



कोकोपीट मशीन



पिलेट मशीन


THE
BAKUL GARDEN
& VISITOR CENTER
Gateway to Shirdi Municipal Council s SWM Initiatives


शिर्डी शहराच्या विकासाचा
साईरथ...
स्वच्छता व
घनकचरा व्यवस्थापन ...
आजरोजी शिर्डी नगरपरिषदद्वारे ओला व सुका कचरा विलगीकरण करुन ओल्या कच-यापासून उत्तम दर्जाचे कंपोस्ट खत तयार केले जाते, तर सुक्या कच-याचे पुन्हा दुय्यम वर्गीकरण करुन प्रक्रियेसाठी पाठविला जातो.
आज रोजी शिर्डी शहरातील कुठल्याही भागात उघडयावर सांडपाणी सोडले जात नसून संपुर्ण शहरात भुयारी गटर असल्याने आरोग्य व स्वच्छतेच्या बाबतीत नगरपरिषदेने नावलौकीक मिळविला आहे.

# स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन ...



## शिर्डी बनले स्वच्छ शहरांसाठी 'रोल मॉडेल'



## कचराकोंडी ते पंधरा कोटी

स्वच्छ शहरांत शिर्डीचा दुसरा क्रमांक, दीडशे कर्मचाऱ्यांचे अहोरात्र काम



राज्यात दुसरा क्रमांक : राज्य सरकारकडून १५कोटींचे बक्षीस

## स्वच्छ शहरात साईनगरीचा देशात तिसरा क्रमांक



स्वच्छतेत साईनगरीला पंधरा कोटीचे बक्षिस

## स्वच्छता सर्वेक्षणात शिर्डी देशात तिसरी तर राज्यात दुसरी

# वृंदावन ट्रॅक

शिर्डी शहरातून वाहणा-या नाला क्रं.34 चे नुतणीकरण करुन सदर ठिकाणी वृंदावन ट्रॅक तयार करण्यात आला आहे. याद्वारे परीसर सुशोभीकरण, भुजल पाणी पातळीत वाढ, वृक्ष लागवड, प्रदुषण नियंत्रण, वीज बचत, नागरी आरोग्याबाबत जनजागृती इ. हेतू साध्य करण्यात आले आहे.

➢ उपलब्ध निधी- अमृत योजना


वृंदावन बंधारा व ट्रॅक, शिर्डी


vivo V29



दिव्य मराठी

अहिल्यानगर सिटी 11-12-2025

**दिव्य मराठी विशेष** ओढ्याच्या दोन्ही बाजूने सुशोभीकरणासह जॉगिंग ट्रॅकची निर्मिती, भाविकांना पर्यटनाची सोय

# शिर्डीतील दुर्गंधी असलेल्या नाल्याचे 'वृदांवना'त रूपांतर

नवनाथ दिघे | शिर्डी

श्रद्धा-भक्ती आणि साईंची भूमी असलेल्या शिर्डी शहरात आता विकास, सुशोभीकरण आणि पर्यावरणाचे रक्षण, या मूल्यांची नव्याने ओळख तयार होत आहे. नगरपरिषदेकडून सुरू असलेले नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे शिर्डी स्वच्छ व सुंदर बनली आहे. सर्वसामान्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असलेल्या शहरातील ओढ्याचं 'वृंदावन ट्रॅक' या नावाने रूपांतर करण्यात आले. ड्रेनेजने भरलेला नाला आज हरित स्वप्नासारखा भासत आहे. जॉगिंग ट्रॅक, ओपन जीम, विविध सामाजिक संदेश देणारे शिल्प, विविध जातीचे वृक्ष, सौरदिवे, आणि शांततेत काही क्षण घालवण्यासाठी बेंचेस . यामुळे आता हा वृदावन ट्रॅक भाविक व स्थानिकांसाठी पर्यटनाचे केंद्र बनले आहे.

'गटार ते वृदांवन ट्रॅक या नव्या बदलामुळे फक्त स्वच्छता नाही तर शहरी नियोजनबध्द विकासाचे नवे मॉडेल नगरपालिकेने उभे केले आहे. ओढ्याच्या खोलीकरणामुळे परीसरात हिरवळ वाढली, आणि नागरिकांना सकाळ-संध्याकाळ विश्रांतीचं, आरोग्याचे नवे ठिकाण मिळाले आहे. सकाळ-संध्याकाळ फिरायला, व्यायामाला आणि शांततेत वेळ घालवण्यासाठी आता लोकांची पसंती याच ठिकाणाला वाढत आहे. उर्वरित पान ४



पाण्याने भरलेला वृंदावन ट्रॅक. इन्सेटे : पुर्वीचा शिर्डी शहरातील ओढा.

**एक्स्पर्ट**

कैलासबापू कोते,
माजी नगराध्यक्ष.

## पर्यावरणपूरक विकासाचं एक उत्कृष्ट उदाहरण

शिर्डी पालिकेच्या या उपक्रमांना आवश्यक निधी, शासन मंजुरी व मार्गदर्शन यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचा पुढाकार असल्याने हा उपक्रम मॉडेल म्हणून समोर येत आहे. शिर्डी फक्त धार्मिक पर्यटनाचं केंद्र न राहता, पर्यावरणपूरक शहरी विकासाचं एक उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे. 'गटार' म्हणून ओळखले गेलेले नाले आता 'वृंदावन' आणि 'नंदनवन' झाले.

# नंदनवन ट्रॅक :-

शिर्डी शहरातील नाला क्रं.33 वर पुर्णत: अतिक्रमण झाल्याने सदर नाल्याचा नैसर्गिक प्रवाह बंद झालेला होता. शिर्डी नगरपरिषदद्वारे या नाल्यावरील सर्व अतिक्रमणे काढून नाला रुंदीकरण करुन त्यास रिटेनिंग वॉल बांधण्यात आली. या नाल्याचे भोवती मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात आली. तसेच मियावाकी पध्दतीने दाट वृक्ष लागवड करुन येथे नंदनवण ट्रॅक विकसीत करण्यात आला.

- उपलब्ध निधी- नगरपरिषद निधी, माझी वसुंधरा अभियान बक्षीस रक्कम.




अहिल्यानगर, रविवार, ३ ऑगस्ट २०२५

सकाळ

सकारात्मकता

# हरित शिर्डीची संकल्पना साकार

## मुख्याधिकारी दिघेंचा पुढाकार : पंचवीस हजार वृक्षांचे संगोपन

**सतीश वैजापूरकर : सकाळ वृत्तसेवा**

शिर्डी, ता. २ : वृक्षप्रेमी मुख्याधिकारी अशी साईंच्या शिर्डीत स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या मुख्याधिकारी सतीश दिघे यांनी पालिकेच्या माध्यमातून शहरात तब्बल पंचवीस हजार देशी वृक्षांचे संगोपन केले. त्यातून हरित शिर्डी ही संकल्पना प्रत्यक्षात आली. लागवड केलेले वृक्ष पंचवीस ते तीस फूट उंचीपर्यंत वाढले. त्यावर घरटी करून वास्तव्यास असलेल्या पक्ष्यांची किलबिल अन् उन्हाळ्यात थंडगार सावली. यामुळे पर्यावरणाच्या दृष्टीने देखील ही मोहीम उपयुक्त ठरली. मोक्याच्या ठिकाणी असलेल्या तब्बल चाळीस ओपन स्पेस भूखंडावर वृक्षसंगोपन करून शहर हिरवेगार करणारी ही राज्यातील एकमेव नगरपालिका ठरली.




शिर्डी : नगर परिषदेच्या माध्यमातून मुख्याधिकारी सतीश दिघे यांनी मोक्याच्या ठिकाणी असलेल्या ओपन स्पेसवर देशी वृक्षांची लागवड व संगोपन करून हरित शिर्डी संकल्पनेस चालना दिली.

'सकाळ'शी बोलताना मुख्याधिकारी सतीश दिघे म्हणाले, मी यापूर्वी २०१८ साली मुख्याधिकारी म्हणून येथे पहिल्यांदा रुजू झालो. त्यावेळी पालिकेच्या हद्दीत तब्बल ४० ओपन स्पेस होत्या. बऱ्याच ठिकाणी त्यावर काटेरी झुडूपे वाढलेली होती. शहराच्या सौंदर्याला बाधा येत होती. त्या विकसित झालेल्या नव्हत्या. काही ठिकाणी अतिक्रमणे देखील झालेली होती. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेने या ओपन स्पेस ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला. या जागा ताब्यात घेतल्यानंतर पालिकेने तेथे स्वच्छता मोहीम राबविली. काटेरी झुडूपे आणि अतिक्रमणे काढून टाकली. आवश्यक तेथे भिंती बांधून या जागा संरक्षित केल्या.

त्यावर कडुनिंब, पिंपळ, तमन, बहावा, कृष्णसखा, बकुळ, कदंब ही देशी वृक्ष लावली. वृक्ष लावून आम्ही थांबलो नाही. या वृक्षांची नित्य देखभालीची व्यवस्था उभी केली. वृक्षांसाठी ठिबक सिंचनाची व्यवस्था केली. पाण्याची उत्तम सोय व नित्य देखभाल यामुळे अल्पावधीतच हे वृक्ष आकाशाकडे झेपावली. आज या झाडांची उंची तीस ते चाळीस फूट झाली. घनदाट सावली आणि पक्ष्यांच्या निवास यामुळे पर्यावरणाचे एक चक्र परिपूर्ण झाले. शहराच्या सौदर्यीकरणात भर पडली.

शहरात जवळपास सर्वत्र कॉंक्रिटीकरण झाले. काही ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसले. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाते, ते शहराच्या भूभागावर जिरत नाही. अशावेळी या विकसित केलेल्या हरित ओपनस्पेस शहराच्या फुफ्फूसाचे काम करीत आहेत. हवेतील ऑक्सिजन मात्रा वाढते. शिवाय पावसाचे पाणी या भागात हमखास जिरते. त्यामुळे शहरात सर्वत्र भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. अशा पद्धतीने ओपन स्पेस विकसित करणारी शिर्डी ही राज्यातील पहिली पालिका आहे.



❝ शिर्डी नगर परिषदेतर्फे पंचवीस हजार देशी झाडांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्यात आले. त्यामुळे शहरातील रस्ते आणि ओपनस्पेस हिरव्यागार झाल्या. वृक्षलागवड आणि संगोपनाची ही मोहीम सध्याही सुरू आहे. मियावाकी पद्धतीने जागा मिळेल तेथे जंगल विकसित करण्याचा प्रकल्प पालिकेने हाती घेतला. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि युवानेते डॉ. सुजय विखे पाटील यांच्या संकल्पनेतून शहरात सौदर्यीकरणाची विविध कामे प्रगतिपथावर आहेत. त्यातही पर्यावरणपूरकतेला महत्त्व देण्यात येत आहे. पालिकेने ताब्यात घेऊन विकसित केलेल्या ओपन स्पेसची संख्या ४0 आहे. एकूण क्षेत्र १७ एकर आहे. त्याची सरकारी किंमत किमान सत्तर कोटी रुपये आहे.

- **सतीश दिघे**, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपरिषद

# श्वान निर्बीजीकरण केंद्र :-

शिर्डी नगरपरिषदद्वारे नुकतेच स्वमालकीच्या जागेत अत्याधुनिक श्वान निर्बीजीकरण केंद्र उभारणेत आलेले असून मागील तिन महिन्यात येथे 600 श्वानांचे निर्धारीत पध्दतीने निर्बीजीकरण करण्यात आलेले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश, प्राणी जन्म नियंत्रण नियम-2023 तसेच शासन निर्णय दि.20 मार्च 2025 अन्वये प्राप्त निर्देशांचे पालन करणेसाठी सदर निर्बीजीकरण केंद्र अत्यंत महत्वाचे ठरत आहे.

- उपलब्ध निधी- नगरपरिषद निधी


शिर्डी नगरपरिषद, शिर्डी
श्वान निर्बीजीकरण केंद्र
Dog Sterilization
Unit


QFCX+3M2, Shirdi, Maharashtra 423109, India
Shirdi
Maharashtra
India
2025-10-27(Mon) 11:18(am)
29°C
84°F
Google


श्वान निर्बीजीकरण
शस्त्रक्रिया व
अँन्टीरेबीज लसीकरण
शिबीर
Helpline no.
www.universalanimalwelfaresociety.org
AUTOCLAVE
STERILIZATION
GPS Map Camera
Google
Shirdi, Maharashtra, India
Qfcx+q4, Shirdi, Maharashtra 423109, India
Lat 19.771952° Long 74.49792°
Saturday, 13/12/2025 08:49 AM GMT +05:30

# नगरपरिषद स्तरावरील अंगणवाडी :-

शिर्डी नगरपरिषद हद्दीत अंगणवाडी नसल्याने व शासनाकडून नवीन अंगणवाड्यांना मान्यता मिळत नसलेने नगरपरिषद स्तरावर 5 अत्याधुनिक अशा अंगणवाडया तयार करण्यात आलेल्या आहेत. शिर्डी शहरात बाहेरुन स्थलांतरीत झालेल्या मजूर तसेच भाडेकरु नागरीकांच्या मुलांसाठी सदर अंगणवाडया अत्यंत महत्वपुर्ण ठरणार आहेत.

- उपलब्ध निधी- जिल्हा नियोजन योजना





# महाराष्ट्र सुरक्षा बल (MSF)

शिर्डी येथे नेहमीच साईभक्तांची गजबज असल्याने येथे रस्त्यावर अतिक्रमण, पिक पॉकेटींग, चैन स्नॅचींग, नगरपरिषद आस्थापना/जागा येथे अवैध कृत्य यासारखे प्रकार घडत असतात. या बाबींवर नियंत्रण आणनेकरीता नगरपरिषद स्तरावर MSF जवान नियुक्त करण्यात आलेले आहेत. सदर जवानांकरीता स्वतंत्र वाहन खरेदी करुन देण्यात आलेले असून तिन शिफ्टमध्ये 24X7 सदर जवान काम करतात. नगरपरिषदेच्या या निर्णयामुळे शहरातील नागरीकांमध्ये विशेषत: महिलांमध्ये तसेच साईभक्तांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण झालेली असून नगरपरिषद आस्थापनांच्या सुरक्षेसाठी तसेच अतिक्रमण अथवा तत्सम कार्यवाहीसाठी सदर जवान अत्यंत उपयोगी ठरत आहे.

उपलब्ध निधी- नगरपरिषद निधी


MSF
GPS Map Camera
Check In
शिरडी, महाराष्ट्र, भारत
Qf3h+9f9, शिरडी, महाराष्ट्र 423109, भारत
Lat 19.753488° Long 74.478843°
शनिवार, 08/11/2025 10:25 AM GMT +05:30
Google


ान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
ा शैक्षणिक संकुल

# शिर्डी शहर सुशोभीकरण :-

शिर्डी हे श्री साईबाबांचे समाधी क्षेत्र असलेले जागतीक किर्तीचे तिर्थक्षेत्र असल्याने येथे कोटयावधी भक्त श्री साईबाबांचे दर्शनासाठी येतात. याकरीता, शहर सुशोभीत असणे आवश्यक असल्याने नगरपरिषदद्वारे सुशोभीकरणाची अनेक कामे पुर्ण केली आहेत. यामध्ये लॅन्डस्केपींग पॅटर्न- गजलक्ष्मी- फुलपाखरे यासारख्या विविध संकल्पनांचा वापर करुन डिव्हायडर सुशोभीकरण, I LOVE SAI BABA सारखे सेल्फी पॉईंट, श्री साईबाबांचे जीवनावर आधारीत संकल्पना वापरुन चौक सुशोभीकरण, सामाजीक संदेश देणारे मेरी बेटी मेरा अभिमानसारखे शिल्प तसेच नैसर्गिक वॉटर बॉडीज् यांचे नुतणीकरन नागरीकांना फिरण्यासाठी ट्रॅक यासारखे सुशोभीकरणाची कामे पुर्ण करण्यात आली आहेत.

उपलब्ध निधी- नगरपरिषद निधी, जिल्हा नियोजन निधी, स्वच्छ भारत अभियान बक्षीस रक्कम.




।।ओम साई राम।।
जैसा भाव रहा जिस जन का,
वैसा रुप हुआ मेरे मन का।
साईबाबा वचन


HOTEL
HANTA

शिर्डी नगरपरिषद
vivo V29
kunal....


शिर्डी नगरपरिषद
Way to
vivo V29
kunal....


शिर्डी नगरपरिषद
द्वारावती भक्तनिवास
vivo V29
kunal....


शिर्डी शहर सुशोभीकरण...
बोलक्या भिंती...


शिर्डी शहरातील सुशोभित
केलेले विविध चौक...
वृंदावन
शिर्डी नगरपरिषद


श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक
शिर्डी नगरपरिषद




मेरी बेटी
मेरा अभिमान
शिर्डी नगरपरिषद, शिर्डी
"मेरी बेटी, मेरा अभिमान"
संकल्पना व शिल्प सौजन्य
मा.खा.डॉ.सुजयदादा विखे पाटील
दि.८.०३.२०२५


शिर्डी नगरपरिषद
I LOVE
SAIBABA


NO PARKING



याशिवाय नगरपरिषदद्वारे महिला बचत गटांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन व घनकचरा व्यवस्थापन बाबत जनजागृतीद्वारे महिला सक्षमीकरण, घनकचरा उपविधीचे माध्यमातून जनजागृती व शिस्त, सोलर कोल्ड स्टॉरेज आधारीत नगरपरिषद फुल मार्केट, स्पर्धा परिक्षा केंद्र व वाचनालय, अत्याधुनिक फायर स्टेशन तसेच नगरपरिषद पाणीपुरवठा साठवण तलावाचे 40 एकर क्षेत्राला पुर्णत: जिओमेमरीन शीट टाकणे यासारखी महत्वाची कामे करण्यात आलेली आहेत.

# प्रस्तावीत महत्वाचे प्रकल्प / कामे :-

१.श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत थिम पार्क

२.स्वागत कमानी/ हेरीटेज गेट

३.परीक्रमा मार्ग

४.मिनी स्पोर्टस कॉम्पलेक्स

५.बटरफ्लाय गार्डन (नमो उद्यान)

६.शहर सुशोभीकरण टप्पा-2

७.PPP तत्वावर पार्कींग

८.अपना दवाखाना

९.विकास आराखडयातील रस्ते भूसंपादन व विकास

# थिम पार्क- श्रद्धा सबुरी धाम, शिर्डी

साईरथ...








RETAIL
RETAIL
TICKETING
RETAIL
RETAIL
SHRADDHA SABURI DHAM


RETAIL
RETAIL


RETAIL
RETAIL
RETAIL
RETAIL






















retail
retail






retail
retail
















SHRADDHA SABURI DHAM




SABURI DHAM











# अमृत योजना २.०

## अमृत योजने अंतर्गत खालील कामे मंजूर करणेत आलेली आहेत.

### शिर्डी पाणीपुरवठा योजना

प्रकल्प किंमत – रु. ३२.६९ कोटी
सदयस्थिती- ८०% काम पूर्ण

### शिर्डी भुयारी गटार योजना

प्रकल्प किंमत – रु. ४५.४४ कोटी
सदयस्थिती- ८५% काम पूर्ण

### पुनमनगर नाला पुनरुज्जीवन

प्रकल्प किंमत – रु. २.८७ कोटी
सदयस्थिती- काम पूर्ण

### बगीचा विकास

प्रकल्प किंमत – रु. ०.९२ कोटी
सदयस्थिती- ६५ % काम पूर्ण


Thu, 13/11/2025, 9:13:34 AM
QF2H+J3H, Shirdi, Maharashtra 423109, India
Lat: 19.7512°, Long: 74.4783° 463 m
21.38°C
1.64m/s
40%
Google


Note cam lite
Address : Nandurkhi Bk.,Maharashtra,India
Latitude : 19.74656337°
Longitude : 74.4515927°
Altitude : 521.0 meter
Date : 02/24/2024 11:40 am
Note : BT



TTP Plant



TTP Pumping Machinery

# पुनमनगर नाला पुनरुज्जीवन













# धन्यवाद